मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १५० ■ मंगळवार, ०२ सप्टेंबर २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# तर यातूनही मार्ग निघू शकतो



## फडणवीसांचा आंदोलकांना प्रामाणिक सल्ला

**मुंबई : हॅलो प्रभात**

आझाद मैदानावर मराठा मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांचे आरक्षण च्या आरक्षणाच्या मुद्द्यावर आमरण उपोषण सुरू आहे. मराठा आंदोलनाबाबत मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. हायकोर्टाने आज दुपारी ४ वाजेपर्यंत आझाद मैदान वगळता, इतर सर्व ठिकाणाहून मराठा आंदोलकांना हटवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, काही ठिकाणी घडलेल्या अनुचित प्रकाराबद्दल तीव्र शब्दांत नाराजीही व्यक्त केली आहे. मनोज जरांगे पाटील उपोषणाच्या निर्णयावर ठाम आहेत. यातून मार्ग कसा काढता येईल, यावर मुख्यमंत्री यांनी मराठा आंदोलकांना प्रामाणिक सल्ला दिला.

आम्ही आंदोलकांना सांगत आहोत की चर्चे तून मार्ग निघू शकतो. तुमचे जर शिष्टमंडळ असेल तर त्यांच्याशी आम्ही चर्चा करतो. पण आम्ही चर्चा कुणाशी करायची हाच प्रश्न आहे.

माइक वर चर्चा करा, अशी चर्चा होते का? तरीही त्यांच्याकडून काही आलं तर आम्ही त्यावर विचार करतोय. त्यांनी एक निवेदन दिले आहे, त्यावर आमची चर्चा सुरू आहे. त्यातून काय मार्ग निघू शकतो तेदेखील आम्ही पाहत आहोत. सरकारला कुठलीही आडमुठेपणाची भूमिका घेता येत नसते. सरकार कधीही कुठलाही इगो धरत नाही. त्यामुळे आम्ही त्यातून जो मार्ग निघू शकतो, तो काढण्याचा प्रयत्न करत आहोत. जर चर्चेला कुणी समोर आले, तर त्यातून लवकर मार्ग निघू शकेल,' असा प्रामाणिक सल्ला देवेंद्र फडणवीस यांनी दिला.यावेळी देवेंद्र फडणवीस असेही म्हणाले, सुप्रिया सुळे यांच्यासहित सर्वांना माझी अशी विनंती आहे की, अशा प्रकारच्या सामाजिक प्रश्नांवर राजकीय पोळी भाजणे बंद करा. कारण त्यातून आपलंच तोंड पोळतं. सुप्रिया सुळे यांनी स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे की मराठा समाजाचे प्रश्न इतके का चिघळले? त्यावर सोल्युशन कोणी काढले? त्यांनी एकदाही मराठा समाजाच्या बाजूने कोणताही निर्णय घेतला नाही. मराठा आरक्षणचे आणि मराठ्यांच्या बाजूचे निर्णय हे आमच्या सरकारने घेतलेत. मी आणि एकनाथ शिंदे यांनी याबाबतचे निर्णय घेतले. आता पुन्हा आमचे सरकार निर्णय घेत आहे. त्यामुळे मला असं वाटतं की त्यांनी आपली राजकीय पोळी भाजणं बंद केलं पाहिजे, अशी टीकाही फडणवीसांनी केली.

पुढे ते म्हणाले, कायदा आणि सुव्यवस्था खराब झाली असे म्हणता येणार नाही. कारण बऱ्याच ठिकाणी रास्ता रोको किंवा गाड्या अडवण्याचे प्रकार झाले. पण पोलिसांनी अवघ्या काही मिनिटातच त्यांना बाजूला करून लोकांची गैरसोय थांबवली. आंदोलकांकडून अशा प्रकारच्या वर्तणुकीची अपेक्षा नाही. पण जर आता अशा वर्तणुकीचाही समर्थन होणार असेल, तर महाराष्ट्राची संस्कृती कुठल्या दिशेने चाललीये याचा आपण विचार करायला हवा. आंदोलकांच्या अशा वर्तणुकीमुळे छत्रपती शिवरायांचा अपमान होतोय हे त्यांनी समजून घेतले पाहिजे. उच्च न्यायालयाने याबाबत सुनावणी घेतली आहे. सरकारचा प्रयत्न असतो की गोष्टी सामंजस्याने सुटाव्यात. पण आता न्यायालयाने कडक शब्दात आदेश दिल्याने, ज्या प्रकारची कारवाई अपेक्षित आहे तशी कारवाई प्रशासनाला करावीच लागेल, असेही फडणवीस यांनी ठणकावले.

### मुंबईची लाईफलाईन खोळंबली

आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनामुळे मुंबईची 'लाईफलाईन' समजली जाणारी मध्य रेल्वे ची वाहतूक विस्कळीत झाली आहे. आज सकाळी, आंदोलकांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्टेशनवर रेल्वे रुळांवर उतरून जोरदार घोषणाबाजी केली. यामुळे रेल्वे सेवा जवळपास २० ते ३० मिनिटे उशिराने धावत आहेत, त्यामुळे लाखो प्रवाशांचे हाल झाले.



### मेलो तरी या ठिकाणाहून उठणार नाही !

मुंबईकरांना त्रास होईल असं वागू नका, कुणाचं ऐकून गोंधळ घालू नका. मी मेलो तरी या ठिकाणाहून उठणार नाही, आरक्षण मिळवून दिल्याशिवाय मागे हटणार नाही. जर तुम्हाला आरक्षण नको असेल, गोंधळ घालायचा असेल तर तुमच्या गावाकडे जा. मला वेदना होत आहेत. समाजाचा अपमान होईल, मान खाली जाईल असं वागू नका, असेही मनोज जरांगे-पाटील म्हणाले.

# संक्षिप्त...

## कोल्हापूरचा पाणीपुरवठा आठ दिवसांनंतर सुरळीत

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

काळम्मावाडी येथील थेट पाईपलाईनच्या बंद पडलेल्या पंप दुरुस्तीचे काम शनिवारी रात्री उशिरा पूर्ण झाल्यामुळे शहराचा पाणी पुरवठा सुरळीत झाला आहे.गेल्या आठ दिवसांपासून शहरवासीयांना ऐन सणात पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले. मंगळवारी पंप दुरुस्त झाला. परंतु टेस्टिंगवेळी तो पुन्हा बंद पडल्याने त्याचे पार्ट मिळविण्यासाठी महापालिकेला धावाधाव करावी लागली होती.

## विसर्जन मिरवणुकीवर सीसीटीव्हीची नजर

**कराड : हॅलो प्रभात**

शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी केलेले देखावे पाहण्यासाठी या कालावधीत होणाऱ्या गर्दीचा व काही अनुचित प्रक्रार होऊ नये याचा विचार करुन, नगरपरिषदेने शहरातील प्रमुख अशा नागरिकांच्या वर्दळीच्या ठिकाणी ९३ कॅमेरे बसविले आहेत. विसर्जनाच्या दिवशी नगरपरिषदेकडून स्वागत कक्ष उभारला जाणार आहे. श्रींचे विसर्जन सुरळीत पार पडावे यासाठी नगरपरिषदेकडील फिरती पथके तैनात राहणार आहेत.

## कोयना परिसरात कमी पाऊस अन् जादा पाणी आवक

**पाटण : हॅलो प्रभात**

मागील तीन महिन्यांत कोयना धरणाच्या शिवसागर जलाशयात १४७.८४ टीएमसी पाण्याची आवक झाली आहे. ३१ मे अखेर धरणात २३.१२ टीएमसी इतका पाणीसाठा शिल्लक होता. पश्चिम वीज निर्मितीसाठी १०.६१ टीएमसी, पूर काळातील ८.९६ टीएमसी अशा १९.५७ टीएमसी पाण्यावर वीज निर्मिती करण्यात आली आहे. अशा एकूण ६७.५८ टीएमसी पाण्याच्या विसर्गानंतरही धरणात सध्या १०१.१३ टीएमसी पाणीसाठा आहे.

## मॉडेल करिअर सेंटरचा लाभ घेण्याचे आवाहन

**सांगली : हॅलो प्रभात**

जिल्ह्यातील रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगार केंद्र शासनाद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सांगली येथे करिअर सेंटरची सुरुवात केली आहे. इच्छुक उमेदवारांनी या सेंटरचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त इनुजा शेख यांनी केले आहे.

# ओबीसी आरक्षणामध्ये दुसरे वाटेकरी नको

## छगन भुजबळ

**मुंबई : हॅलो प्रभात**



ओबीसी समाजातील प्रमुख नेत्यांच्या बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, मराठा समाज ओबीसीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. त्यांचा ठाम दावा आहे की मराठा समाज सामाजिक दृष्ट्या मागास नाही आणि त्यामुळे त्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ दिला जाऊ शकत नाही.

भुजबळ पुढेम्हणाले, मराठा आणि कुणबी एकच असं म्हणणे मूर्खपणाचं आहे. उच्च न्यायालयाने देखील हे स्पष्टपणे सांगितलं आहे की मराठा समाज हा ओबीसी वर्गात समाविष्ट होऊ शकत नाही. जर कोणत्याही जातीय वर्गाने ओबीसी आरक्षणाचा फायदा घेतला तर तो आमच्यावर अन्याय ठरेल. आमच्या विरोधात जाणुनबुजून काही गोष्टी केल्या जात असतील तर आम्हीही मुंबईत येऊ असा इशारा मंत्री भुजबळ यांनी दिला.

# कुठल्याही धमकीला राणे परिवार कधीच घाबरत नाही : आ.निलेश राणे

## जरांगे पाटलांच्या टीकेवर आ.निलेश राणेंचे प्रत्युत्तर

**मुंबई : हॅलो प्रभात**

भाजप नेते नितेश राणे यांच्यावर बोचऱ्या शब्दात जरांगे पाटलांनी टीका केली होती, तसेच चिचुंद्री म्हणत आंदोलन झाल्यावर बघतोच, असेही म्हटले होते. आता या टीकेवरुन शिवसेना आ. निलेश राणे यांनी प्रत्युत्तर दिलंय.



नितेश राणे एखाद्या विषयावर बोलल्यानंतर त्यावर तुम्ही टीका करा पण वयक्तिक टीका नको. नितेश काही टोकाचं बोलला नाही, किव्हा वैयक्तिक बोलला नाही. कुठल्याही धमकीला राणे परिवार कधीच घाबरत नाही, तुम्ही जसे मरायला तयार असता तसेच आम्ही राणे पण असतो. आमच्या परिवाराच्या सदस्यावर कोण हाथ टाकायच्या वार्ता करत असेल तर ते आम्ही कधीही सहन करणार नाही. म्हणून भाषा जपून वापरली पाहिजे कारण आम्ही तुम्ही काही परके नाही. विषय सोडवताना नातं तुटता कामा नाही याची काळजी घेतली पाहिजे, अशा शब्दात निलेश राणे यांनी मनोज जरांगे पाटलांवर पलटवार केला आहे. तसेच, मनोज जरांगे पाटील तुमचे आणि माझे संबंध नेहमी आपुलकीचे राहिले, कौटुंबिक राहिले ते तसेच राहिले पाहिजे. मी आजपर्यंत नातं जपलं, पुढेही जपेन आपल्याकडून पण तीच अपेक्षा आहे, असेही आ. राणे यांनी म्हटलंय.

# डीकेटीई म्हणजे उज्वल करिअरची हमी : रवी आवाडे

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**



जगभरातील स्पर्धात्मक परिस्थितीला समर्थपणे तोंड देणारे, नवकल्पनाशिल व गुणवत्तापूर्ण अभियंते घडविण्याची ऐतिहासिक परंपरा डीकेटीईची आहे. बदलत्या शैक्षणिक प्रवाहात सक्षम अभियंते घडविण्याची क्षमता आणि सामर्थ्य डीकेटीईमध्ये आहे असे प्रतिपादन डीकेटीईचे कार्यकारी संचालक रवी आवाडे यांनी प्रथम वर्ष बी.टेक. टेक्स्टाईल व इंजिनिअरींग, डिप्लोमा, एमबीए व एमसीए विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात केले.

देशातील कानाकोपा-यातून विविध पार्श्वभूमी व जिज्ञासू वृत्ती घेवून येणा-या विद्यार्थ्यांना नविन वातावरणाशी जुळवूण घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, त्यांच्यात आत्मीयता निर्माण करणे व भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करणे हा या स्वागतसमारंभाचा मुख्य हेतू आहे. घोरपडे नाटयगृह, इचलकरंजी येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या मानद सचिव डॉ सपना आवाडे होत्या. यावेळी बोलताना रवी आवाडे यांनी, सांगत विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तम करिअरसाठी अनेक प्रेरणादायी मंत्र सांगितले.

संचालिका प्रा.डॉ. सौ.एल.एस.अडमुठे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत असताना विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच शिक्षण घेतानांच जगभरातील विविध कंपन्यात प्लेसमेंट देण्यामध्ये डीकेटीई ही संस्था देशात आघडीवर आहे. त्यामुळेच जगभरातील अनेक कंपन्या आपल्या उद्योगात डीकेटीई मधील विद्यार्थ्यांना शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यास इच्छुक असतात असे उदगार काढले.

कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रगीताने झाली. प्रा. एस.ए. पाटील यांनी 'सॉग ऑफ युथ' हे सर्वाना सांगितले. प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ ए.के.घाटगे यांनी विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांशी समन्वय साधत आपले अभ्यासक्रमातील अधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्याविषयी मार्गदर्शन केले. डे.डायरेक्टर प्रा.डॉ.यु. जे. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी मिळिवलेल्या आंतरराष्ट्रीय यशाबददल माहिती सांगितली.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा.आर.के.वळसंग यांनी आभार मानले. सुत्रसंचालन प्रा. शिवतेज पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी श्रेया पाटील व सच्चितानंद यांनी केले. कार्यक्रमास सर्व डीन्स, सर्व विभागप्रमुख, टेक्स्टाईल व इंजिनिअरींग टीपीओ, ऑफीस प्रमुख, करिअन गायडन्स सेल प्रमुख, क्रिडाप्रमुख, लायब्ररी प्रमुख आदींची उपस्थिती होती.

# पी.व्ही.पी.महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**तासगाव : हॅलो प्रभात**



येथील पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग अधिनस्त, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या क्षमता आणि कौशल्य विकास यांची समृद्धी यावर आधारित एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. एम. एस. एफ. डी. ए. ही संस्था महाराष्ट्रातील उच्च शिक्षणामध्ये कार्यरत असलेले विविध महाविद्यालयातील अध्यापक, विद्यार्थी, तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांना अधिक सक्षम बनविण्यासाठी, राष्ट्रीय शिक्षण धोरणच्या धरतीवर विविध नवोपक्रमांची रुजवण सातत्याने करित असून हे उपक्रम परिवर्तनीय आहेत असे उद्गार प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी आपल्या अध्यक्षीय उद्बोधनात काढले. याप्रसंगी प्रास्ताविक कार्यशाळेचे समन्वयक प्रा. रोहित लोंढे यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत आणि आभार प्रो. डॉ. जीवन घोडके यांनी मानले.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात साधन व्यक्ती डॉ. गौरव कडलाग व धनश्री पडवल यांनी संस्थेद्वारे राबविले जाणाऱ्या विविध क्रियाकलपाद्वारे उपस्थितांना म ार्गदर्शन केले, तसेच महाविद्यालय स्तरावरील उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नांची उकल करण्यात आली. दुसऱ्या सत्रामध्ये साधनव्यक्ती सलीम सय्यद व सविता शिनगारे यांनी महाविद्यालय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी केंद्रित उपक्रमांची माहिती दिली. सदर कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील विविध विभागाचे गुरुदेव कार्यकर्ते, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळेची सांगता विविध नवोउपक्रम राबवून भविष्यामध्ये विद्यार्थी केंद्रित उपक्रमांना बढती देण्यासंदर्भात उद्बोधन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रयत्नशील उपक्रम राबविले जातील असे आश्वासन उपस्थितांकडून देण्यात आले. कार्यशाळेचे प्रतिनिधित्व डॉ.पवन तेली आणि डॉ. सुनिल गावित यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. आण्णासाहेब बागल यांनी केले आहे.

# मानवी मूल्य आणि नैतिकतेच्या माध्यमातूनच राष्ट्राची प्रगती शक्य : भूपेश के.गोयल

## मिलिंद काळे यांना डॉ.डी.वाय.पाटील 'जीवन गौरव' पुरस्कार ; डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठाचा २० स्थापना दिवस उत्साहात

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



मानवी मूल्य आणि नैतिकता या माध्यमातूनच राष्ट्राची प्रगती शक्य असल्याचे प्रतिपादन अतिविशिष्ट सेवा मेडल आणि विशिष्ट सेवा मेडलने सन्मानित आर्म्ड फोर्स मेडिकल सर्व्हिसेसचे महासंचालक लेफ्टनंट जनरल भूपेश के. गोयल यांनी केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना संस्काराची शिदोरीही देणारे डी. वाय. पाटील विद्यापीठ येत्या काही वर्षात जागतिक दर्जावर नावलौकिक मिळवेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या २० वा स्थापना दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कॉसमॉस बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सीए. मिलिंद काळे यांना कुलपती डॉ. संजय डी पाटील यांच्याहस्ते 'डॉ. डी. वाय. पाटील जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा २० वा स्थापना दिवस सोमवारी उत्साहात संपन्न झाला. सकाळी साडेनऊ वाजता विद्यापीठ प्रांगणात लेफ्टनंट जनरल भूपेश के. गोयल यांच्या हस्ते ध्वजवंदन व त्यानंतर विद्यापीठ गीत झाले. कुलपती डॉ. संजय डी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला विश्वस्त पृथ्वीराज पाटील, सीए मिलिंद काळे, कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, कुलसचिव डॉ व्ही व्ही भोसले, परीक्षा नियंत्रक अभय जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी एन सी सी कॅडेटने मानवंदना दिली.हॉटेल सयाजीच्या मेघ मल्हार सभागृहात स्थापना दिनाच्या निमित्तान मुख्य कार्यक्रम झाला. यावेळी कॉसमॉस बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सीए. मिलिंद काळे यांना कुलपती डॉ. संजय डी पाटील यांच्याहस्ते 'डॉ. डी. वाय. पाटील जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, अॅडव्हायझर सौ. वृषाली पृथ्वीराज पाटील, सीए मिलिंद काळे, कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, कुलसचिव डॉ व्ही व्ही भोसले आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना लेफ्टनंट जनरल भूपेश के. गोयल म्हणाले, युवकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आणि सशक्त राष्ट्र निर्माण करण्यासाठी शिक्षणाचे अमूल्य योगदान आहे. विद्यार्थी हीच देशाची शक्ती असून उत्तम शिक्षण, नव तंत्रज्ञान, संशोधन यांच्या जोडीने चांगले संस्कार या माध्यमातून युवा पिढीला कर्तृत्वशील बनवल्यास देश महासत्ता बनेल. हेच कार्य डी वाय पाटील विद्यापीठ उत्तम प्रकारे करत असल्याचे गौरवउद्गारही त्यांनी काढले. कुलपती डॉ. संजय डी. पाटील म्हणाले, विद्यापीठाला नॅक ए प्लस प्लस आणि क्यू एस आयगेज डायमंड मानांकन

मिळाले आहे. यातून विद्यापीठाची गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. यापुढे जागतिक क्रमवारीसाठी आम्ही प्रयत्नशील असून येत्या दोन वर्षात जगातील सर्वोत्तम विद्यापीठामध्ये स्थान मिळवण्याचे आमचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष सीए मिलींद काळे यांनी, सन्मानाला उत्तर देताना डी.वाय.पाटील विद्यापीठाने दिलेली कौतुकाची थाप आणखी जबाबदारी वाढवणारी आहे. पाटील कुटुंबाने राज्यभर शिक्षणाची वनराई तयार केली आहे. ४० - ५० वर्षापूर्वी शिक्षणातील बदलती ओळखून डी. वाय. पाटील यांनी शिक्षणाची ज्ञान गंगा आणली. यावेळी माजी कुलगुरू डॉ. बी. पी. साबळे, डॉ माणिकराव साळोखे, डॉ. विलासराव साळोखे, कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष अॅड. प्रल्हाद कोकरे व संचालक मंडळ, आर्मी अधिकारी, डी वाय पाटील कृषी आणि तंत्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. प्रथापन, डी वाय पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी आकुर्डीचे कुलगुरू प्रा. मनीष भल्ला, शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पी एस पाटील, डी वाय पाटील ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ.गुप्ता यांच्यासह विविध संस्थांचे प्राचार्य, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, सत्कारमूर्ती व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## संपादकीय

# संधीचे सोने करायचे की माती करायची हे चीनच्या हातात

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या चीनच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनिपिंग यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही जागतिक नेत्यांत जवळपास पन्नास मिनिटे चर्चा झाली. या भेटीत अनेक विषयांवर चर्चा झाली. दोन्ही देशात बिघडलेले संबंध सुधारण्यावर या भेटीत भर देण्यात आला. या दौऱ्यात दोन्ही देशात करार होण्याची शक्यता आहे. २०१८ नंतर नरेंद्र मोदी यांचा हा पहिलाच चीन दौरा आहे. मोदींच्या या दौऱ्याकडे भारताचेच नाही तर जगाचे लक्ष लागले आहे कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क ( टॅरीफ ) लावल्यानंतर भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे बिघडले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी केवळ भारतावरच नाही तर चीन, मेक्सिको, कॅनडा, ब्राझील या आणि यासारख्या अन्य देशांवर देखील टॅरीफ लावले आहे. त्यामुळे भारतासह या देशातही अमेरिकेविरुद्ध प्रचंड नाराजी आहे. मात्र सर्वात जास्त चीड ही भारत आणि चीन या देशात आहे भारत आणि चीन या दोन्ही देशांवर अमेरिकेने प्रचंड टॅरीफ लावले आहेत त्यामुळे अमेरिकेच्या या दडपशाही विरुद्ध हे देश एकत्र येत आहे त्यामुळेच हा दौरा विशेष महत्वाचा ठरतो. काही दिवसांपूर्वीच भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर रशियाच्या दौऱ्यावर गेले होते तिथे दोन्ही देशांनी मिळून अमेरिकेची दडपशाही मोडून काढण्याचा निर्णय घेतला. रशिया पाठोपाठ आता चीनशी ही भारत सलगी वाढवत आये त्यामुळे अमेरिकेच्या विरोधात या तीन देशांची युती होत आहे असे मानले जात आहे. चीन आणि रशिया या जागतिक महासत्ता अमेरिकेच्या विरोधातच होत्या भारताचे अमेरिकेशी घनिष्ट संबंध होते मात्र डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोर स्वभावामुळे भारतही आता अमेरिकेच्या विरुद्ध जाऊन चीन आणि रशिया यांच्या सोबत गेला तर त्याचे जागतिक राजकारणावर दुरगामी परिणाम होतील. अमेरिकेला शह देण्यासाठी हे तीन देश एकत्र आले तर अमेरिकेला निश्चितच पर्याय निर्माण होईल त्यामुळेच या दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. भारत आणि रशिया हे पारंपरिक मित्र राष्ट्र आहे. संकटाच्या काळी या दोन्ही देशांनी एकमेकांना मदत केली आहे याउलट भारत आणि चीन हे एकमेकांचे कधीच मित्र नव्हते. भारत आणि चीनचे शत्रुत्व जगजाहीर आहे. चीनने भारताला कायम शत्रू मानले आहे. भारताने चीनशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचाच प्रयत्न केला चीनने मात्र भारताचा विश्वासघातच केला आहे. १९६२ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी तर हिंदी चिनी भाई भाई म्हणत चीनशी मैत्रीचा हात पुढे केला होता मात्र चीनने भारताचा केसाने गळा कापत भारतावर आक्रमण करत भारताचा काही भूभाग बळकावला. त्यानंतरही चीनने अनेकदा भारताच्या खोड्या काढल्या. २020 मध्ये गलवान खोऱ्यात चिनी आणि भारतीय सैनिकांची झालेली झपाटपट अजूनही ताजीच आहे या झटापटीत भारताचे २0 जवान शहीद झाले होते. चीन भारताच्या गलवान खोऱ्यासह अरुणाचल प्रदेशावर दावा सांगतो. अरुणाचल प्रदेश हा चीनचाच भूभाग आहे असे चीन म्हणतो त्यामुळेच चीनशी भारताचे वैर आहे. भारत पाकिस्तान युद्धात चीनने कायम पाकिस्तानची बाजू घेतली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या सिन्दुर संघर्षात चीनने पाकिस्तानची उघडपणे बाजू घेतली होती इतकेच नाही तर पाकिस्तानने या संघर्षात वापरलेले लष्करी साहित्यही चीननेच पुरवले होते म्हणूनच चीनवर भारत कसा विश्वास ठेवणार असा प्रश्न पडतो. चीन हा जगातील सर्वात अविश्वासू देश आहे. जेव्हा जेव्हा भारताने चीनशी मैत्रीचा हात पुढे केला त्या त्या वेळी चीनने भारताचा विश्वासघात केला त्याचीच पुनरावृत्ती आता होईल की काय अशी शंका उपस्थित केली जाते आणि ती रास्तही आहे पण बदललेल्या राजकीय परिस्थितीत या दोन्ही देशांना एकत्र येण्याशिवाय पर्यायही नाही. अमेरिकेला शह द्यायचा असेल तर भारत, रशिया आणि चीन यांना एकत्र यावेच लागेल. जागतिक राजकारणातले हे तीन देश एकत्र येत आहे हे स्वागतार्ह आहे. भारत, रशिया आणि चीन यांचा त्रिकोण झाला तर तर त्याचा जागतिक राजकारणावर दुरगामी परिणाम होणार हे निश्चित. मात्र त्यासाठी यातील तिसरा कोण असलेल्या चीनने जर आपला विर्श्वासघातकी स्वभाव सोडून दिला तरच हे शक्य आहे. अमेरिकेला शह देण्याची चीनची खरोखर इच्छा असेल तर त्यांनी मनापासून भारताशी मैत्री करायला हवी आणि आपल्यावर लागलेले विर्श्वासघातकी हे बिरूद काढून टाकायला हवे. मागील अनुभव पाहता हे होईल असे छातीठोकपणे कोणी सांगू शकणार नाही मात्र कोठून तरी सुरवात झाली हे देखील सुचिन्ह म्हणावे लागेल. दोन्ही देशांना मजबुरीने का होईना एकत्र यावे लागत आहे. आता एकत्र राहायचे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करायचे हे चीनच्या हातात आहे ही एक सु संधी आहे. या संधीचे सोने करायचे की नेहमीप्रमाणे माती करायची हे चीनच्या हातात आहे.

# बहुगुणी नारळ अर्थात कल्पवृक्ष

**कोकणात नारळाची लागवड मोठ्या प्रमाणात होत असली, तरी त्यावर आधारीत प्रक्रीया उद्योग फारसे सुरु होऊ शकले नाही. त्यामुळे जागतिक नारळ दिनानिमित्त कोकणात नारळ प्रक्रीया उद्योगांना चालना देण्यासाठी व्यापक प्रयत्न होणे गरजेचे आहे.**

नारळाला कल्पवृक्ष असे संबोधले जाते. कारण नारळाच्या झाडाच्या प्रत्येक भागापासून उपयुक्त वस्तुंची निर्मिती होऊ शकते. पण कोकणात कल्पवृक्षाची संकल्पना कालबाह्य होत चालली आहे. शहाळी आणि नारळ विक्रीपलीकडे या पिकाचा फारसा वापर होताना दिसत नाही. कोकणात ३५ हजार हेक्टर क्षेत्रावर नारळाचे उत्पादन घेतले जाते. यातून उत्पादित होणारे ९० टक्के पिक हे नारळ आणि शहाळी म्हणून वापरले जाते. शहाळ्याची तसेच नारळाची चोड ही फेकून दिली जातात. नारळाच्या इतर भागांचा वापर करून वस्तुंची निर्मिती करण्याचे प्रमाण नगण्य आहे. धक्कादायक बाब म्हणजे नारळावर प्रक्रीया करणारा एकही मोठा उद्योग कोकणात सुरु होऊ शकलेला नाही. नारळावर प्रक्रीया करून विविध प्रकारची उत्पादने घेतली जाऊ शकतात. प्रक्रीया करून टाकून देण्यात येणाऱ्या करवंटी आणि चोडांपासून दागिने, शर्टाची बटने, शोभेच्या वस्तू, चुल आणि तंदूरमध्ये जाळण्यासाठी कोकोनट चारकोलच्या वड्या तयार केल्या जाऊ शकतात. नर्सरी आणि गार्डिनग उद्योगासाठी कोकपिठ तयार केले जाऊ शकते. जे मातीतील ओलावा टिकवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. शहाळ्यातील नारळावर प्रक्रीया करून उच्च प्रतीचे तेल तयार केले जाऊ शकते. या तेलाला सौंदर्यप्रसाधन उद्योगात मोठी मागणी असते.



कोकणात नारळ प्रक्रीया उद्योगांना चालना देण्यासाठी शासन स्तरावर अनेक प्रयत्न सुरु आहेत. कोकण कृषी विद्यापिठाने यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केला आहे. पण या प्रयत्नांना फारसे यश मिळताना दिसत नाही.

विशेष बाब म्हणजे कोकणातील काही तरुणांनी याबाबतचे प्रशिक्षण सुरु केले असले आणि उद्योगांचे प्रशिक्षण घेतले असले तरी उद्योग सुरु होऊ शकलेले नाहीत. तसेच बागांची निगा राखण्यात झालेल्या दुर्लक्षामुळे नारळाच्या उत्पादनात मोठी घट होताना दिसते आहे. अशातच इरीयोफाईडसारख्या रोगांचा प्रादुर्भाव बागायतदारांसाठी डोकेदुखी ठरतो आहे. पाडेकरी मिळणे दुरापास्थ झाल्याने बागांची निगा राखण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे अनेक बागायतदार या पारंपरिक पिकापासून दुरावले जाऊ लागले आहेत. नारळाचे उत्पादन वाढवणे गरजेच आहे. दुसरीकडे नारळापासून तेल, काथ्याउद्योग, जेली प्रोडक्ट सुरु केले जाऊ शकतात. याशिवाय काजू फेणी नारळ फेणी बनवून मद्यनिर्मिती केली जाऊ शकते. पण यासाठी गरज आहे ती सकारात्मक दृष्टीकोनाची. केरळच्या धर्तीवर नारळावर आधारीत प्रक्रीया उद्योग सुरु झाले. तर कोकणातील हे नारळ बागायतदारांना चांगले दिवस येऊ शकतील. रायगड जिल्ह्यातील आक्षी येथे काही वर्षांपुर्वी काथ्यावर आधारीत एक छोटेखानी प्रक्रीया उद्योग सुरु करण्यात आला होता. मात्र त्यासाठी लागत असणाऱ्या काथ्या केरळमधून आणावा लागत होता. नारळाच्या चोडापासून काथ्या तयार करण्याचे तंत्रज्ञान कोकणात विकसित होऊ न शकल्याने हा उद्योग कालांतराने बंद पडला. अलिबाग तालुक्यातील यतिन घरत यांनी शहाळ्याच्या पाण्यापासून कोकोनट जेली तयार करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. शहाळ्याच्या पाण्यावर प्रक्रीया करून त्यात नारळाचे तुकडे टाकून जेली तयार केली जात आहे. लहान मुले आणि पर्यटकांकडून या जेलीला चांगली मागणी मिळते. पण या प्रकल्पासाठी लागणारे तंत्रज्ञान आणि मशिनरी त्यांना विदेशातून आयात करावे लागत आहे.




**● 'कोकणात नारळ प्रक्रीया उद्योगांना चालना देण्यासाठी व्यापक प्रयत्न होणे गरजेचे आहे. या उद्योगांसाठी लागणारे तंत्रज्ञान आणि मशिनरी सहज उपलब्ध होणे अपेक्षित आहे. शेतकरी आणि बागायतदारांना काढणी पश्चात तंत्रज्ञानाबाबत शास्त्रशुद्ध मार्गदर्शन मिळत नाही आणि बागायतदारांची नारळ आणि शाहळे यापलीकडे विचार करण्याची मानसिकता बदलत नाही तोवर यात फरक पडणार नाही.'**

# चिंचणीतील जनसेवा संस्था भजनातून जपते संताचा वारसा

**चिंचणी : हॅलो प्रभात**



महाराष्ट्राच्या सामाजिक व आध्यात्मिक जीवनाचा पाया संत ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या शिकवणूकीवर आधारित आहे.संताची हीच शिकवण पुढे पुढे नेणे गरजेचे आहे.सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जडणघडणीत वारकरी संप्रदायाचे योगदान खुप मोठे आहे.संतानी घडवलेले ही परंपरा केवळ भक्तिमार्ग,प्रेम समता आणि बंधुभाव हा संताचा वारसा आहे. हा वारसा जागरुक राहून ज्ञानोबा ,तुकोबांच्या महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा पताका फडकवत ठेवण्यासाठी सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमातून व उत्सवाच्या माध्यमातून कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं.) मधील जनसेवा बहुउद्देशीय संस्था, ही जनसेवा भजन मंडळाच्या माध्यमातून हिंदू संस्कृतीचे जतन करत आहे. स्व. ह. भ. प. नारायण शेठ मारुती कदम यांच्या पुण्यस्मरणा निमित्त भव्य खुल्या संगीत भजन स्पर्धा सन २०१९-२० मध्ये जनसेवा भजनी मंडळाला उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्रक बहाल करण्यात आले तसेच प्रादेशिक समन्वयक महाराष्ट्र ज्ञान महामंडळ ,पुणे विभाग यांचेकडून ८ मार्च २०१७ चा सन्मानपत्र देऊन संस्थेचा गुण गौरविण्यात आले.

# सीआरआय पंप्सना ३२० कोटी रुपयांची ऑर्डर

**मुंबई : हॅलो प्रभात**

सीआरआय पंप्सचा एक विभाग आणि अक्षय ऊर्जा-चालित जल उपायांमध्ये अग्रणी असलेल्या सीआरआय सोलरला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) कडून 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेअंतर्गत ३२० कोटी रुपये किंमतीच्या ३ एचपी, ५ एचपी आणि ७.५ एचपी क्षमतेच्या १०,७१४ ऑफ-ग्रिड डीसी सोलर फोटोव्होल्टेइक वॉटर पंपिंग सिस्टम्स चे डिझाइन, पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन करण्यासाठी लेटर ऑफ एम्पॅनेलमेंट प्रदान करण्यात आले आहे. एसपीडब्ल्यूपीएसमध्ये इनबिल्ट आयओटी-सक्षम रिमोट मॉनिटरिंग सिस्टम आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात पाण्याची कमी उपलब्धता असलेल्या आणि ग्रिड नसलेल्या भागात विश्वासार्ह पाणी उपलब्धता सुनिश्चित होण्यास मदत होईल, पारंपारिक ऊर्जेवरील अवलंबित्व मोठ्या कमी होईल, सिंचनाच्या विश्वासार्हतेत सुधारणा होईल आणि कृषी उत्पादकता आणि ग्रामीण समृद्धी वाढेल. प्रकल्पाची अंमलबजावणी महावितरणच्या निर्धारित वेळेनुसार सुरू होईल, सीआरआय सोलर वेळेवर, कार्यक्षम आणि उच्च दर्जाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सौर उपयोजनांमध्ये सिद्ध झालेल्या कौशल्याचा वापर करेल.

# स्विगी एचडीएफसी बँक क्रेडिट कार्डला मिळाले नवे अपग्रेड

**मुंबई : हॅलो प्रभात**




भारतातील अग्रगण्य ऑन-डिमांड कन्क्विनियन्स प्लॅटफफॉर्म स्विगीने एचडीएफसी बँकेसोबत भागीदारीत स्विगी एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड ग्राहकांसाठी नवीन प्रवास लाभ जाहीर केला आहे. यात ग्राहकांना पेटीएम ट्रॅव्हलवर देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान प्रवास व बस बुकिंगवर तत्काळ ६% सूट मिळणार आहे. हे कार्डधारकांना आधीपासून मिळणाऱ्या अनेक फायद्यांमध्ये भर घालते, ज्यात स्विगी प्लॅटफफॉर्मवरील आणि त्याबाहेरील खर्चांवर आकर्षक कॅशबॅकचा समावेश आहे. सणासुदीचा काळ जवळ येत असल्याने, दिवाळीच्या कौटुंबिक भेटी असोत किंवा देशांतर्गत वा आंतरराष्ट्रीय सहली असोत, प्रवास योजना मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. प्रत्येक प्रवासावर होणारी त्वरित बचत आणखी महत्त्वाची ठरते. या नव्या फायद्यामुळे, स्विगी एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड रोजच्या खरेदी आणि ऑनलाइन शॉपिंगपलीकडे जाऊन प्रवास योजनेतही बचत उपलब्ध करून देतो. हा लाभ विशेषत: पेटीएम ट्रॅव्हलवर उपलब्ध असून फ्लाइट्स आणि इंटरसिटी बस प्रवासासाठी लागू होतो.

# शिक्षक-सेवक सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**नातेपुते : हॅलो प्रभात**

येथील नातेपुते एज्युकेशन सोसायटी शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

या सभेला प्रमुख पाहुणे म्हणून नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे सचिव अँड शिवाजीराव पिसाळा, उपसभापती मामासाहेब पांढरे, व्हा. चेअरमन संतोष काळे, महेश शेटे, नंदन दाते, मुख्याध्यापक विनायक देशपांडे, कुंडलिक इंगळे व उपप्राचार्य भारत पांढरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



सभेच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन आबासाहेब देवकाते होते.

यावेळी सर्व सभासद, संचालक मंडळ उपस्थित होते. सभेची सुरुवात संस्थेचे चेअरमन आबासाहेब देवकाते यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी संस्थेच्या मागील वर्षाच्या प्रगतीचा आढावा घेतला. पतसंस्थेचे सचिव अभिजित वाळके यांनी मागील वर्षाचा वार्षिक अहवाल सादर केला, ज्यामध्ये संस्थेची आर्थिक स्थिती, ठेवी, कर्जे आणि निव्वळ नफा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. सर्व विषय एकमताने मंजूर केले.

यावेळी मान्यवरांनी संस्थेच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन केले. तर सूत्र संचलन सारिका जगताप यांनी केले.

# प्रविण माने यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांचा सत्कार पुणे जिल्हा भाजपची नवी कार्यकारणी जाहीर

**इंदापूर : हॅलो प्रभात**

भारतीय जनता पार्टीची पुणे जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. आकाश कांबळे, गजानन वाकसे, शिवाजीराव निंबाळकर नानासाहेब शेंडे व प्रवीणकुमार शहा या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा भाजप नेते माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा प्रविण माने यांनी सत्कार करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आकाश कांबळे जिल्हा सरचिटणीस, गजानन वाकसे



ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष, शिवाजीराव निंबाळकर उपजिल्हाध्यक्ष, नानासाहेब शेंडे जिल्हा चिटणीस, तर प्रवीणकुमार शहा यांची पुणे जिल्हा व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. या पदाधिकाऱ्यांची नव्याने केलेल्या निवडीमुळे भविष्यात पक्षाची ताकद वाढणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसीत भारताची व भारतीय जनता पक्षाची ध्येय धोरणे प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचवून त्यांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणावर भाजपशी जोडला जाणार असल्याची भावना यावेळी प्रविण माने यांनी व्यक्त केली.

# सारथीच्या शैक्षणिक व कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांमुळे युवकांना मदत

**दै.हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या लक्षित गटाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था म्हणजेच सारथी ही संस्था काम करते. सारथी संस्थेचे विभागीय कार्यालय कोल्हापूर उपकेंद्र, लातूर, मुंबई, नाशिक, अमरावती, नागपूर, औरंगाबाद व पुणे येथे आहेत. सारथीमार्फत मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी अनेकविध योजना राबविल्या जात आहेत. शैक्षणिक योजनांच्या लाभामुळे मराठा समाजातील अनेक विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी मदत झाली आहे. तर कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांतून युवकांची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुरू आहे. या योजनांबाबत थोडक्यात माहिती.

डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृती योजना - या योजनेंतर्गत गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यास संबंधित विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेने अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक इ. शुल्क संबंधित विद्यापीठ /शैक्षणिक संस्थेमार्फत संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते.

जे विद्यार्थी वसतिगृहात जागेअभावी अन्यत्र राहात असतील अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह शुल्क व भोजन शुल्काची रक्कम ही तो शिक्षण घेत असलेल्या संबंधित संस्थेच्या आकारणी करण्यात येत असलेल्या रकमेच्या मर्यादेत विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते.

विद्यार्थ्यांसाठी शुल्क सहाय्यासोबत वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदि विविध सुविधा दिल्या जातात. महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना - महाराष्ट्र राज्यातील अधिवास असलेले मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा या सारथीच्या लक्षित गटातील मुलामुलींना परदेशात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पीएच.डी)चे विशेष अध्ययन करण्यासाठी आर्थिक मदत करणे, या हेतुने ही योजना राबवली जाते. महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा या जातीतील पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि पीएच. डी साठी अद्ययावत QS, World university ranking 200 च्या आतील परदेशी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना (पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका दोहोंसाठी ५० आणि पीएच. डी साठी २५) ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

सारथी
शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती

या माध्यमातून मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळून त्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होते. छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम -(CSMS-DEEP)- या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सारथीच्या लक्षित गटातील ४० हजार उमेदवारांना प्रतिवर्षी नि:शुल्क प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. तीन वर्षात १ लाख २० हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे ध्येय असून आतापर्यंत ९७२८६ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) च्या माध्यमातून उमेदवारांना 4 module AVJV soken English, soft skills, IT skills, accounting with Tally, Hardware and Networking, web designing, data managaement, digital freelancing, mobile adevelopment आदि कोर्सेस शिकवले जातात. लक्षित गटातील उमेदवारांसाठी सारथी मार्फत सदर प्रशिक्षण मोफत उपलब्ध करुन दिले जाते. या योजनेंतर्गत प्रति विद्यार्थी रु. २६ हजार ३६० रुपये खर्च येतो. आतापर्यंत महाराष्ट्रामध्ये ३६ हजार ४१८ विद्यार्थी पास झाले असून ९ हजार २२४ विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त झाला आहे.

श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम-इंडो-जर्मन टूल रूम (IGTR)- इंडो-जर्मन टूल रूम(IGTR), औरंगाबाद ही संस्था भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय अंतर्गत काम करते. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत औरंगाबाद, पुणे, नागपूर व कोल्हापूर येथील प्रशिक्षण केंद्रांमधून एकूण २४ अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते.

ही संस्था पदव्युत्तर स्तर, पदव्युत्तर पदविकास्तर, पदविकास्तर आणि प्रमाणपत्रस्तरावर तांत्रिक मनुष्यबळाच्या विस्तृत स्पेक्ट्रमच्या समावेश करण्यासाठी विविध अभ्यासक्रम उपलब्ध करते. त्यामध्ये टूल डिझायनिंग, CAD/CAM, CNC_eZJ, LCA तसेच टेलर मेड मोड्युलस च्या विशिष्ट क्षेत्रातील अल्पकालीन अभ्यासक्रमांची संख्या ग्राहकांच्या गरजेनुसार डिझाईन आणि आयोजित केली जाते.

**● संकलन - संप्रदा बीडकर**
**जिल्हा माहिती अधिकारी,सांगली**

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक **हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

हॅलो प्रभात
सांगली-कोल्हापूर
जिल्हा विशेष ▪ मंगळवार, ०२ सप्टेंबर २०२५





## संमिश्र

## प्रमोद पाटील यांचा उपोषणकर्त्यांना जाहीर पाठिंबा



**हुपरी : हॅलो प्रभात**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई येथे सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी हुपरी शहर मराठा समाजाने आज एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले. या आंदोलनात मोठ्या संख्येने मराठा समाजातील कार्यकर्ते आणि ज्येष्ठ मंडळी सहभागी झाले होते.यावेळी छत्रपती ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद पाटील यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शवला. प्रमोद पाटील म्हणाले, ५१% मधून जे आरक्षण गमावले आहे, तेथूनच पुन्हा घटनेच्या चौकटीत बसणारे ओ बी सी प्रवृगातून आरक्षण मिळवावे लागेल. या लढ्यात सर्वपक्षीय आमदारांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून मराठा समाजाच्या हितासाठी एकत्र येण्याची गरज आहे. शासनाला या प्रश्नावर तातडीने निर्णय घेण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. प्रमोददादांच्या हस्ते सरबत पिऊन उपोषणकर्त्यांनी आपले लाक्षणिक उपोषण सोडले. यावेळी बोलताना प्रमोददादा पाटील यांनी, मनोज जरांगे पाटलांची ताकद वाढवण्यासाठी हा आरक्षणाचा लढा राज्यभर अधिक तीव्र करू, असा निर्धार व्यक्त केला. यावेळी मराठा समाजातील प्रमुख व्यक्ती तसेच छत्रपती ग्रुपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षण मिळेपर्यंत हा संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार उपोषणकर्त्यांनी व्यक्त केला.

## नवयुग ग्रुपच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची परंपरा कायम



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

पन्हाळा तालुक्यातील तिरपण येथे गेल्या ५१ वर्षांपासून भक्तीभावाने चिखलाची विना रंगाची गणेश मूर्ती बसविण्यात येते. पर्यावरणपूरकतेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून हा उत्सव साजरा केला जात असल्याने तिरपण गावाची परंपरा विशेष ठरली आहे. येथील नवयुग तरुण मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सवात पारायण सोहळा यांचे आयोजन करण्यात येते. तसेच सर्वांसाठी महाप्रसादाचेही आयोजन होत असल्याने गावकरी मोठ्या संख्येने सहभागी होतात. सामाजिक बांधिलकी जपत मंडळाकडून रक्तदान शिबिर, परिसरात स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबविण्यात येतात. समाजहितासाठी प्रत्येक वेळी काहीतरी नवनवीन देण्याची आस या ध्येयाने कार्यरत असलेले नवयुग तरुण मंडळ गावकऱ्यांच्या एकतेचे व पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे उत्तम उदाहरण ठरत आहे. यावेळी नवयुग तालीम मंडळाच्या ६१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. अध्याक्ष,उपाध्यक्ष, तानाजी पाटील, अजित पाटील, ओंकार पाटील, नितीन पाटील, जयसिंग पाटील,गुंडा पाटील,सागर पाटील,भांबू कुंभार,सचिन पाटील,संजय पाटील,युवराज पाटील,अभिजित पाटील,रोहित पाटील,सतीश पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

येथील ओंकार सुतार या युवकाने आपल्या गणपती सजावटीसाठी प्लास्टर ऑफ पॅरिस आणि रंग वापरून तयार केलेली पन्हाळा किल्ल्याची सुंदर प्रतिकृती गणेश भक्तांचे लक्ष वेधून घेत आहे. ही प्रतिकृती पाहण्यासाठी परिसरातून गणेश भक्तांची मोठी गर्दी होत असून सर्वत्र त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## गौरी विसर्जन निर्माल्य कुंडातच करण्याचे आवाहन : दिग्विजय ढवळे

**अर्जुनवाड : हॅलो प्रभात**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि घरगुती गणेश विसर्जनावेळी मोठ्या प्रमाणावर निर्माल्य कृष्णा नदी पात्रात टाकल्यामुळे नदीच्या पाणीप्रदूषण वाढते तसेच जलीय जीवांवर वाईट परिणाम होतो. त्यामुळे यंदा गणेश विसर्जनाच्या वेळी नागरिकांनी निर्माल्य पाण्यात न टाकता इनफोर्स फाउंडेशन सामाजिक संस्था यांनी उभारलेल्या निर्माल्य कुंडातच निर्माल्य जमा करण्याचे आवाहन इन फोर्स फाउंडेशनचे अध्यक्ष दिग्विजय ढवळे यांनी केले आहे. गेल्या चार-पाच वर्षापासून इनफोर्स फाउंडेशन मार्फत वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवले जातात त्याचाच एक भाग म्हणून गणेश विसर्जनाच्या वेळी निर्माल्य एकत्रित गोळा करून कंपोस्ट खत करण्यात येते. लोकसहभागातून कृष्णा नदी स्वच्छ ठेवण्याचे आवाहन इनफोर्स फाउंडेशन ने केले आहे.

# भारतीय टपाल खात्याचा महत्वपुर्ण निर्णय

### पोस्टाची रजिस्टर्ड पोस्ट सेवा होणार इतिहास जमा




**कवठेमहांकाळ : जालिंदर शिंदे**

भारतीय टपाल खात्याने एक महत्वपुर्ण निर्णय घेतला असून,भारतीय टपाल खात्याने १ सप्टेंबर २०२५ पासून रजिस्टर्ड पोस्ट सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय टपाल विभागाच्या आधुनिकीकरण योजनेचा एक भाग असून याचा उद्देश काम अधिक जलद चालवणे असा असल्याचे टपाल विभागाने स्पष्ट केले आहे.रजिस्टर्ड पोस्ट सेवा ही आता स्पीड पोस्टमध्ये विलीन केली जाईल.टपाल विभागाच्या या निर्णयामुळे सर्वात जुनी रजिस्टर्ड पोस्टसेवा आता इतिहासजमा होणार आहे. टपाल विभागाच्या सचिव आणि महासंचालकांनी सर्व सरकारी कार्यालये, न्यायालये,शाळा-महाविद्यालये आणि मोठ्या प्रमाणात टपाल सेवा वापरणार्यांना १ सप्टेंबरपर्यंत पूर्णपणे स्पीड पोस्टवर वळण्याचे निर्देश दिले आहेत.त्यांच्या मते स्पीड पोस्ट सेवेमुळे डिलिव्हरी जलद होईल,ट्रॅकिंग चांगले होईल आणि कामकाजात अधिक पारदर्शकता येईल. रजिस्टर्ड पोस्ट सेवा ही १८५४ मध्ये सुरू झाली होती.

त्यानंतर स्पीड पोस्ट सेवा ही १९८६ मध्ये सुरू झाले.मात्र रजिस्टर्ड पोस्टपेक्षा स्पीड पोस्ट सेवा ही लोकांमध्ये आधिकच लोकप्रिय होत आहे.रजिस्टर्ड पोस्ट सेवा बंद केल्याने अनेक लोक भावनिक झाले आहेत,विशेषतः वृद्ध आणि गावांमध्ये राहणारे लोक ही सेवा अगदी ब्रिटिश काळापासून सुरू होती आणि बँका,विद्यापीठे,न्यायालये आणि सरकारी कार्यालयांसाठी विश्वासार्हही होती.त्याची खासियत अशी होती की डिलिव्हरीचा पुरावा न्यायालयातही वैध ठरत होता. आता ते बंद केल्याने केवळ तांत्रिक बदल होणार नाहीत तर एका ऐतिहासिक टपाल सेवेचाही अंत होणार आहे.

# सिपीआर मेडिकल कॉलेजमध्ये भ्रष्टाचार

### भ्रष्ट कारभाराविरोधात मनसेचे जोरदार आंदोलन



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

जिल्ह्यातील आरोग्यसेवेचा कणा मानल्या जाणाऱ्या सिपीआर मेडिकल कॉलेजमध्ये भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारांचे गंभीर आरोप होत असून, याच विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जोरदार आंदोलन छेडले. तात्पुरत्या जामिनावर बाहेर असलेला भ्रष्टाचारी मयूर लिंबेकर आणि सीपीआर मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. सत्यवान मोरे यांचा नरिकेलम कॅफे मध्ये झालेला गळाभेटीचा व्हिडीओ जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर झाल्यानंतर प्रशासनात खळबळ माजली होती. या व्हिडीओत लिंबेकरवरील प्रलंबित गुन्ह्यांबाबत डॉ. मोरे यांनी तडजोड केल्याचा आरोप आहे. तरीसुद्धा या गंभीर प्रकरणात कारवाईची गती मंद असल्यामुळे संताप वाढला आहे.डॉ.मोरे यांचा सेवानिवृत्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता.

मात्र, भ्रष्टाचार झाकण्यासाठी होणारा हा कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा पूर्वीच दिल्याप्रमाणे मनसेने सीपीआरच्या आवारात निदर्शने केली. जिल्हाध्यक्ष राजू दिंडोर्ले, शहराध्यक्ष प्रसाद पाटील, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष अभिजीत राऊत, शहराध्यक्ष अजिंक्य शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत जोरदार निषेध व्यक्त केला.

नंतर पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेऊन लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्यात स्थानबद्ध केले. या आंदोलनात मनसेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. रुग्णांची सेवा करणारे हे रुग्णालय भ्रष्टाचाराच्या विळख्यात सापडले असून, जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिक व मनसेने केली आहे.

## डॉ. संजय पाटील यांचे कार्य समाजाभिमुख : संजय बोंबले



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

स्वराज्य प्रतिष्ठान तर्फे आणि डॉ.संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सवानिमित्त महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले. या प्रसंगी पन्हाळा पोलीस निरीक्षक संजय बोंबले व डॉ. संजय पाटील (वाईकर) यांच्या उपस्थितीत भक्तीभावाने महाआरती संपन्न झाली. कार्यक्रमात विशेषतः गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी व मान्यवरांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला.

सामाजिक जाणिवा व प्रेरणादायी कार्यातून नवतरुणाईला प्रोत्साहन मिळावे, यासाठी हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

डॉ.संजय पाटील यांचीही सपत्नीक सत्कार विविध पदाधिकारी यांच्या वतीने आयोजित केला.यावेळी अध्यक्ष शरद लव्हटे, पोलिस पाटील मुरारजी सातपुते, राम नाईक, बाजीराव पाटील, सोनबा बेलेकर, योगेश्वर पाटील, मयुर पाटील, महादेव पाटील, महेश लव्हटे, प्रकाश पाटील आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजे रामराव महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न



**जत : हॅलो प्रभात**

हॉकिचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या जयंती व राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जत येथील राजे रामराव महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून आरोग्य तपासणी शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड येथील माजी मराठी विभागप्रमुख डॉ.उज्वला देमण्णापाटील व इचलकरंजी येथील आक्काताई रामगोंडा कन्या महाविद्यालय येथील सहा. प्राध्यापिका प्रा.प्रतिभा पैलवान उपस्थित होत्या. याप्रसंगी बोलताना डॉ.उज्वला पाटील म्हणाल्या की, आपले मन, शरीर सदृढ ठेवण्यासाठी उत्तम आरोग्य महत्वाचे आहे.

त्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे आणि व्यसनापासून अलिप्त राहणे गरजेचे आहे. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांनी मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा विश्वातील योगदानाबद्दल माहिती देऊन राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबीराविषयी विद्यार्थ्यांना आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालक प्रा.अनुप मुळे यांनी तर आभार प्रा.दीपक कांबळे यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.

## इचलकरंजी फेस्टिव्हलचा ३ सप्टेंबरपासून शुभारंभ : मोश्मी आवाडे

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ असलेल्या इचलकरंजी फेस्टिव्हलमध्ये यंदाची नव्या रंगात व नव्या ढंगात स्पर्धा आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. यंदाचा इचलकरंजी फेस्टिव्हल ३ ते ५ सप्टेंबर या कालावधीत श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृह हे भरविण्यात येणार असल्याची माहिती फेस्टिव्हलच्या संयोजिका सौ. मोश्मी आवाडे यांनी दिली.

गणेशोत्सव आणि इचलकरंजी फेस्टिव्हल हे मागील २९ वर्षांपासून एक समीकरणच बनून गेले आहे. पुणे फेस्टिव्हलच्या धर्तीवर माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे यांनी इचलकरंजी फेस्टिव्हलची सुरुवात करुन स्थानिक कलाकारांना एक चांगले व्यासपीठ मिळून दिले आहे. या फेस्टिव्हलच्या माध्यमातून अनेक कलाकारांनी उत्तुंग भरारी घेत इचलकरंजी शहराच्या नांवलौकिकात भर घातली आहे.

यंदाचा फेस्टिव्हलही असाच धमाल उडवून देणारा असणार आहे. श्रीमंत ना.बा. घोरपडे नाट्यगृह येथे फेस्टिव्हलचा शुभारंभ आमदर राहुल आवाडे व माजी मंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत बुधवार ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता श्रीं च्या महाआरतीने होईल. त्यानंतर अन्नपूर्णा पाककला स्पर्धा होणार आहे असे सौ. मोश्मी आवाडे यांनी सांगितले. या सर्व कार्यक्रमांचा शहर व परिसरातील नागरिकांनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन शेखर शहा, अहमद मुजावर यांनी केले आहे.

# हिंदू-मुस्लिम ऐक्याचा इंदापूर पॅटर्न

## मुस्लिम बांधवांकडून गणरायाची महाआरती

**इंदापूर : हॅलो प्रभात**

इंदापूर तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय (मामा) भरणे यांच्या निवासस्थानी येऊन गणरायाची महाआरती केली. या उपक्रमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा अनोखा संदेश संपूर्ण महाराष्ट्रात दिला गेला असून, इंदापूर पॅटर्न ही नवी संकल्पना राज्यभर चर्चेत आली आहे. आरतीवेळी वातावरण गणपती बाप्पा मोरया या घोषणांनी दुमदुमले.

मुस्लिम बांधवांनी पारंपरिक पद्धतीने आरतीत सहभागी होत भरणे कुटुंबीयांसमवेत गणेशोत्सवाचे औचित्य साधले.यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, इंदापूरमध्ये नेहमीच बंधुभाव, एकोपा आणि ऐक्याची परंपरा जपली जाते. धर्म वेगळा असला तरी सण-उत्सवात सहभागी होणे हीच खरी आपली ताकद आहे.

मुस्लिम बांधवांनी महाआरतीत दिलेला सहभाग हा सामाजिक सलोख्याचे प्रतीक आहे.या उपक्रमाला स्थानिक मान्यवर, नागरिक व गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रस्त्याच्या निकृष्ट कामाबद्दल शरदचंद्र पवार पक्षातर्फे उद्या आंदोलन

### तहसीलदार श्यामला खोत-पाटील यांना निवेदन



**शिराळा : हॅलो प्रभात**

मेनी फाटा ते कोकरूड व मेनी फाटा ते धनगरवाडा रस्त्यावर वारंवार घडणारे अपघात व अपघाती मृत्यू तसेच शेडगेवाडी फाटा ते चांदोलीकडे जाणाऱ्या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे कामाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार मार्फत बुधवारी (ता. ३) शेडगेवाडी फाटा येथे धडक आंदोलन व रास्ता रोको करण्यात येणार आहे. या आशयाचे निवेदन आज तहसीलदार श्यामला खोत-पाटील यांना युवा नेते व विराज उद्योग समूहाचे अध्यक्ष विराज नाईक, तालुकाध्यक्ष बी. के. नायकवडी यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिले. निवेदनातील आशय असा की, कराड-मेनी फाटा-शेडगेवाडी ते कोकरूड रस्ता दळणवळणांच्या दृष्टीने उच्च प्रतीचा राज्य महामार्ग १४४ करण्यात आला आहे. या मार्गावर अनेक गावे, वाड्या वस्त्या रस्त्यालगत आहेत. लोकवस्तीच्या ठिकाणी संबंधित विभागामार्फत वाहनांची गती कमी करणारे गतिरोधक किंवा रमलर व कोणत्याही प्रकारचे सूचना फलक उभारण्यात आलेले नाहीत. त्यामुळे या मार्गावर सतत अपघात घडत आहेत. परिणामी अपघातामध्ये काही प्रवासी, पादचाऱ्यांचा मृत्यू झाल्याचा घटना घडल्या आहेत. मेनी फाटा ते मणदूरचा धनगरवाडा जाणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण असून या मार्गावर अनेक गावे, वाड्या, वस्त्या रस्त्यालगत आहेत. अपघात टाळण्यासाठी गावाजवळ कोणत्याही प्रकारचे गतिरोधक अथवा मार्गदर्शक फलक नाहीत. त्यामुळे ठिकठिकाणी नागरिकांच्या जीवितास धोका संभवतो. त्यामुळे या मार्गावर गतिरोधक व मार्गदर्शक फलक लावावेत, अशी आमची मागणी आहे. सध्या शेडगेवाडी फाटा ते चांदोली धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम सुरू आहे. ते अतिशय निकृष्ट दर्जाचे होत आहे. पावसाळ्यात या मुख्य रस्त्याचे काम करणे चुकीचे आहे.

रस्त्यात ठिकठिकाणी केलेल्या खोदाई केल्यामुळे प्रवाशांना व नागरिकांना मोठा त्रास होत आहे. अनेक वाहणे चिखलामध्ये अडकून पडत आहेत. या शिवाय काम सुरू असलेल्या ठिकाणी मार्गदर्शक फलक, पर्यायी रस्ते करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होत आहे. सुरू असलेले रस्त्याचे काम निविदेप्रमाणे केले जात नाही, असा नागरिकांचा आरोप आहे. त्यामुळे निविदेप्रमाणे रस्त्याची रुंदी, खोदलेल्या ठिकाणी पर्यायी रस्ते व प्रत्येक गावालगत गटारींची सोय करून सर्व कामे उच्च दर्जाची व्हावीत, अशीही मागणी आहे. या सर्व विषयाबाबत बुधवार दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी शेडगेवाडी फाटा येथे आम्ही संबंधित गावातील नागरिक व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते धडक आंदोलन व रस्ता रोको करणार आहे.

# मराठा आंदोलकांची पाणी आणि जेवणासाठी झुंबड

## आझाद मैदानाकडे पायी चालत कूच

**नातेपुते : हॅलो प्रभात**

मराठा आरक्षणासाठी राज्यातून मोठ्या संख्येने मुंबईत दाखल झालेल्या आंदोलकांना पाणी आणि जेवणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. विविध भागांतून आंदोलक मुंबईत येत असून, वाशी आणि सीएसटी (उडढ) स्टेशनवर त्यांची मोठी गर्दी झाली आहे. प्रशासनाने चारचाकी गाड्यांना पुढे जाण्यास बंदी घातल्यामुळे हजारो आंदोलक आझाद मैदानाकडे पायी चालत निघाले आहेत. वाशीपासुन आझाद मैदान ५०किमी आहे, आंदोलक ते अंतर चालत पार करीत आहेत.

**वाशी आणि सीएसटीवर प्रचंड गर्दी**

राज्याच्या वेगवेगळ्या भागांतून आलेल्या मराठा आंदोलकांनी मुंबईच्या एंट्री पॉईंट्सवरच गर्दी केली आहे. विशेषतः वाशी आणि सीएसटी रेल्वे स्टेशनवर आंदोलकांची संख्या हजारोंच्या घरात आहे. त्यांना पाणी आणि जेवणाची व्यवस्था करण्यासाठी मोठी धावपळ सुरू आहे. मात्र, मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्याने अनेक आंदोलकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने आझाद मैदानाकडे जाणाऱ्या चारचाकी गाड्यांना परवानगी नाकारल्यामुळे आंदोलकांचा संयम सुटला आहे. अनेक आंदोलक आता पायी चालतच आझाद मैदानाकडे निघाले आहेत. यामुळे मुंबईतील रस्त्यांवर आंदोलकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. या परिस्थितीत आंदोलकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे, तर दुसरीकडे वाहतुकीवरही परिणाम होत आहे.

**सरकारसमोर मोठे आव्हान**

मराठा आंदोलकांना सुरक्षितपणे आणि सोयीस्करपणे आझाद मैदानापर्यंत पोहोचवणे, तसेच त्यांच्यासाठी पाणी, जेवण आणि निवाऱ्याची व्यवस्था करणे हे आता सरकारसमोर एक मोठे आव्हान आहे. आंदोलकांचा हा प्रवास पाहता, मुंबईतील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने आंदोलकांच्या सोयीसाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे. असे अनूभव नातेपुते येथील आंदोलक विश्वजित पिसाळ, विक्रम सावंत, मंगेश जाधव, प्रणव थोरात, ॲड शहाजी मगर, सूरज जाधव, ॲड शुभम गमे, लहू मोहिते, हिंदुराव माने यांनी सांगितला.

# शरदचंद्र पवार अल्पसंख्यांक सेल तर्फे पदवाटप संपन्न



**सांगली : हॅलो प्रभात**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्यांक सेलतर्फे पदवाटप कार्यक्रम शहर जिल्हाध्यक्ष संजयजी बजाज व पक्ष निरीक्षक शेखर माने साहेब यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन शहर जिल्हा अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष आयुब भाई बारगीर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना आयुब भाई बारगीर म्हणाले, आ.जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्वसामान्य व अल्पसंख्यांक समाजाच्या हितासाठी सतत कार्य करणारा पक्ष आहे. पुढील काळात संजय बजाज यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व जाती-धर्मांना एकत्र आणून पक्षवाढीसाठी तसेच जनतेच्या प्रश्नांच्या निवारणासाठी आम्ही काम करणार आहोत. राज्याचे अल्पसंख्यांक समाज इथून पुढच्या काळामध्ये पक्षावर विश्वास ठेवत आहे व पक्षाच्या बरोबर राहील.

यावेळी बोलताना शेखर माने म्हणाले की, आगामी निवडणुका मध्ये पक्ष जास्तीत जास्त नव्या चेहऱ्यांना संधी देईल अल्पसंख्यांक सेलच्या माध्यमातून प्रत्येक वार्डामध्ये नव्याने बूथ कमिटी स्थापन करा.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष संजयजी बजाज म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्वसमावेशक विचारसरणीचा पक्ष आहे. आगामी महापालिका, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत निवडणुकीत जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली आम्ही जोरदारपणे लढणार आहोत. समाजातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आगामी महापालिकेत नव्या चेहऱ्यांना संधी देऊन पक्षाची ताकद वाढवली जाईल. अल्पसंख्यांक ची जिल्हाध्यक्ष आयुब भाई यांच्या माध्यमातून अल्पसंख्यांक सेलची बांधणी जोरात होत आहे.

या कार्यक्रमात कुपवाड शहराध्यक्ष म्हणून साहिल घोरी, शहर जिल्हा उपाध्यक्ष अझरुद्दीन भाई जमादार, व कुपवाड शहर कार्याध्यक्ष पदी शाहरुख शेख यांची निवड करण्यात आली.

कार्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आयुब भाई बारगीर म्हणाले, पक्षासाठी निष्ठेने काम करणारे कार्यकर्ते हा पक्षाचा कणा आहेत. त्याग आणि तळमळीने काम करणाऱ्या या कार्यकर्त्यांमुळेच पक्ष मजबूत झाला आहे. पुढे पक्षात येणाऱ्या नव्या पदाधिकाऱ्यांनीही हाच जोश आणि आत्मविश्वास जोपासून पक्षवाढीसाठी व जनतेच्या सेवेसाठी नेहमी तत्पर राहावं. यावेळी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# जय हनुमान मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर संपन्न



**दूधगाव : हॅलो प्रभात**

जय हनुमान कला व क्रीडा मंडळ, दूधगाव यांच्या वतीने गणेशोत्सव व मंडळाचा २९ वा वर्धापन दिनानिमित्त ङ्करक्तदान हेच महादान, यातूनच घडतो मानवतेचा मान.ङ्क या समाजभावनेतून लक्ष्मी मंदिर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरास परिसरातील नागरिक व युवकांनी तसेच महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी रक्तदान केले. या उपक्रमासाठी हिंदरत्न प्रकाशबापू पाटील रक्तपेढी सांगली यांचे सहकार्य लाभले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष संदीप बादरे, उपाध्यक्ष रोहित शिपुगडे, खजिनदार निखिल नलवडे, सचिव विवेक यादव तसेच सर्व सदस्य व ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

रक्तदात्यांचा सन्मान करून प्रमाणपत्रे व अल्पोपहार देण्यात आला. समाजहिताचा आदर्शवत उपक्रम राबविल्याबद्दल जय हनुमान कला व क्रीडा मंडळ, दूधगाव यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# विश्वास कुंभार यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**शिराळा : नारायण घोडे पाटील**



जिल्हा परिषद शाळा अंत्री खर्दचे मुख्याध्यापक व उपक्रमशील शिक्षक ,शिवाय विविध शैक्षणिक स्पर्धात्मक परीक्षेत विद्यार्थ्यांना यशस्वी करणारे , शाळेचा भौगोलिक परिसर आदर्शवत निर्माण केलेले विश्वास कुंभार यांना इंटरनॅशनल लायन्स क्लब आकुर्डी पुणे यांच्यावतीने आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर .

आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेले व सामाजिक दायित्व जपत असलेल्या इंटरनॅशनल लायन्स कलब आकुर्डी पुणे यांच्या वतीने शिक्षक दिनाच अवचित्य साधून उपक्रमशील शिक्षकांना गौरविण्यात येत आहे . याच माध्यमातून कुंभार यांना यावर्षीचा लायन्स क्लबच्या वतीने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे .सोमवार ८ सप्टेंबर रोजी समारंभ पूर्वक कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती क्लबचे अध्यक्ष व उद्योजक डॉ बाबुराव सागावकर यांनी दिली .

# राष्ट्रीय नेमबाज शरयू मोरे हिचे अपघाती निधन

**सांगली : हॅलो प्रभात**

राष्ट्रीय नेमबाज, रिनाऊंड शूटर शरयू संजय मोरे (वय २२) हिचे बारामती येथे अपघाती निधन झाले. सांगली शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक संजय मोरे यांच्या यांची ती कन्या होत. सातारा जिल्ह्यातील सासुर्वे या मूळ गावी

तिच्यावर अत्यसंस्कार करण्यात आले. शरयू हिने तिने नीट परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळवत बारामती येथे एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत होती. काल दुचाकीचा अपघात झाला. त्यात ती गंभीर जखमी झाली होती. उपचार सुरू असताना तिची



प्राणज्योत मालावली.

दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या ६७ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत शरयू आणि तिचा भाऊ आदित्य या दोघांनाही निष्णात (रिनाऊंड शूटर) होण्याचा बहुमान

मिळवला होता. या स्पर्धेत देशभरातून हजारांवर खेळाडू पात्र ठरले होते. खडतर समजल्या जाणाऱ्या १२ बोअर शॉटगन- ट्रॅप या क्रीडा प्रकारात शरयू हिने दैदिप्यमान यश मिळविले. विजेतेपद मिळवून निष्णात नेमबाज होण्याचा बहुमान मिळवणारी ती पश्चिम महाराष्ट्रीतील पहिली नेमबाज ठरली. तिने राज्य, विभागीय आणि राष्ट्रीय स्पर्धेत यापूर्वी पाच सुवर्ण, एक रौप्य, तर दोन कांस्य पदकांची कमाई

केली आहे.

केवळ २२ व्या वर्षी राष्ट्रीय पातळीवर नाव गाजवणारी शरयू, तिच्या मेहनतीने, जिद्दीने आणि यशस्वी कामगिरीने सांगलीसह सातारा जिल्ह्याचे नाव देशभरात पोहचवले होते. आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी सज्ज होत असतानाच काळाने तिच्यावर घाला घातला. तिच्या आकस्मिक जाण्याने मोरे कुटुंबयांवर दुःखाचता डोंगर कोसळला असून, सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. पोलिस दलातही या घटनेने हळहळ व्यक्त केली जात असून, शरयूच्या रूपाने एक तेजस्वी तारा गमावल्याची भावना पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांनी व्यक्त केली.

# विद्यार्थ्यांच्या प्रयत्नाला पालकांनी साथ द्यावी : मुख्याध्यापक अरुण सावंत




**चिंचणी : हॅलो प्रभात**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक सभा आवश्यक आहेत, संस्कारक्षम पिढी तयार करण्यासाठी पालक आणि शिक्षकांनी चांगले प्रयत्न करावेत, विद्यार्थी जिज्ञासावृत्तीचा असला पाहिजे यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नाला पालकांनी साथ देण्याचे आवाहन मुख्याध्यापक अरुण सावंत यांनी केले.

ते कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील श्री शिवाजी हायस्कूल, मध्ये इयत्ता १० वी च्या विद्यार्थी -शिक्षक-पालक सभा प्रसंगी बोलत होते.

पुढे अरुण सावंत म्हणाले की, पालकांना जबाबदारीची जाणीव असली पाहिजे.शिक्षणातून जीवनाचे परिवर्तन होते.भविष्याचा पाया दहावी असून यश प्राप्ती साठी सातत्य आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व नवनिर्मितीला प्रेरणा देण्यासाठी शालेय उपक्रम अतिशय स्तुत्य आहेत.

यातूनच सर्वांगीण विकासाला वाव मिळतो. बौद्धिक विकासासाठी अवांतर पुस्तके वाचनास दिल्यास विद्यार्थी ज्ञानवादी होतील असा विश्वास दिला.

याप्रसंगी दहावी वर्गशिक्षका श्रीमती शुभांगी माळी व सौ.माधुरी माने यांनी निकालाचे वाचन करुन मुलांना व पालकांना मार्गदर्शन केले.

यावेळी शिक्षक सी.डी. शिंगाडे,राहुल कुंभार तसेच पालक मनोज जाधव, दादासो भोकरे माजी विद्यार्थीनी रेवती पाटणकर यांनी मनोगते व्यक्त केली.

यावेळी सुत्रसंचलन वैशाली लाड यांनी केले. प्रस्ताविक उमाकांत सांवत यांनी केले तर आभार राजेश महाडीक यांनी मानले.यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग,पालक,विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

# मोडनिंबच्या आकाश बुधवतरावची SRPF मध्ये निवड



**मोडनिंब : संतोष पांढरे**

जीवनातील कठीण प्रसंगांना न डगमगता सामना करत आपल्या जिद्दीच्या जोरावर यश मिळवणाऱ्या मोडनिंबच्या आकाश विजय बुधवतराव यांची नुकतीच SRPF (११ गट) मुंबईमध्ये निवड झाली आहे.

या उल्लेखनीय कामगिरीमुळे मोडनिंब तसेच पंचक्रोशीतील नागरिकांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रतिकूल परिस्थितीतही आकाशने आपल्या ध्येयाचा त्याग केला नाही.

दिवसा गॅस दुकानात काम, शेगड्या रिपेअरिंग अशी कामे करून घर सांभाळत तो भरतीच्या सरावाला देखील तितकाच वेळ देत होता.आईला वडिलांची व भावाची उणीव जाणवू न देता आकाशने कष्ट, शिस्त आणि चिकाटीचा मार्ग निवडला.

अखेर त्याच्या मेहनतीचे चीज होऊन त्याची महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलमध्ये निवड झाली आहे.

गावकऱ्यांनी व मित्रपरिवाराने आकाशच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत त्याचे अभिनंदन केले आहे.



# महाराजस्व अभियानांतर्गत पालकमंत्र्यांच्या हस्ते दाखले वितरण

**सांगली : हॅलो प्रभात**

समाजातील भटक्या व विमुक्त जातीतील नागरिकांना जातीचे दाखले देण्याची प्रक्रिया क्लिष्ट असते. मात्र, अशा समाजातील घटकांना जातीचे दाखले देऊन जिल्हा प्रशासनाने संवेदनशीलता दाखवली आहे. याच संवेदनशीलतेने त्यांनी या घटकांना विविध शासकीय योजनांचा लाभ द्यावा, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी येथे केले.

छ. शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत विविध दाखले वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे झालेल्या या कार्यक्रमास आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी अशोक काकडे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, उपविभागीय अधिकारी मिरज उत्तम दिघे, जिल्हा पुरवठा अधिकारी आशिष फुलुके, मिरज तहसीलदार डॉ. अपर्णा मोरे-धुमाळ, सांगली अप्परच्या तहसीलदार अश्विनी वरुटे उपस्थित होते.

# गणपती पंचायतन संस्थानच्या गणपतीचे शाही थाटात विसर्जन

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली संस्थानच्या गणरायाचे रविवारी पाचव्या दिवशी परंपरेनुसार शाही थाटात सरकारी घाटावर विसर्जन करण्यात आले. यावेळी सांगली संस्थानचे श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन, राजलक्ष्मीराजे पटवर्धन, युवराज अदित्यराजे पटवर्धन, राज्यकन्या पोर्णिमाराजे पटवर्धन, व्यवस्थापक जयदीप अभ्यंकर, यांच्यासह सांगलीतील पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या गणेशाच्या विसर्जनानंतर फटाक्याची आताषबाजी करण्यात आली.



सांगली संस्थानच्या गणपती पंचायतन संस्थानतर्फे यंदाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने आणि पारंपारिक व धार्मिक पद्धतीने साजरा करण्यात आला आहे. शाही थाटात मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी पाचव्या दिवशी प्रथम श्रीमंत विजयसिंह पटवर्धनराजे आणि श्रीमंत राजलक्ष्मीराजे पटवर्धन, युवराज अदित्यराजे पटवर्धन, राजकन्या पोर्णिमाराजे पटवर्धन यांच्याहस्ते गणरायाची आरती करण्यात आली. त्यानंतर संस्थानच्या प्रथेप-माणे दरबारातील मान्यवरांना पानसुपारी देण्यात आली. गणरायाची उत्सव मुर्ती सजविलेल्या रथात ठेवण्यात आली.

या रथाच्या पुढील बाजूस ढोल-ताशा पथक, टाळ-मृदंग आणि लेझीम मंडळाचे पथक तसेच मानकरी आणि गणपती पंचायतनचे सर्व सदस्य सहभागी झाले होते. ही शाही मिरवणूक पाहण्यासाठी मोठ्याप्रमाणात सांगलीसह पंचक्रोशीतील भाविक मोठया प्रमाणात उपस्थित होते. ही मिरवणूक सांगलीच्या सरकारी घाट असणाऱ्या कृष्णामाई घाटावर ही मिरवणूक आल्यानंतर आंबी यांच्या सजविलेल्या आणि विद्युत रोषणाई करण्यात आलेल्या नावेतून ही उत्सव मुर्ती कृष्णा नदीच्या मध्यावर नेण्यात आली. त्यानंतर या मुर्तीचे विसर्जन करण्यात आले.



# विद्यार्थी योग्य दिशेला जोडण्याचे काम शिक्षक करतात

## ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक



**राहुरी : हॅलो प्रभात**

समाजातील माणसाला माणसाशी जोडण्याची काम वारकरी संप्रदाय करत असतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये गुणदोष शोधून त्यांना योग्य दिशेला जोडण्यासाठी शिक्षक काम करतात. राहुरी तालुका हा प्रेरणादायी आहे. श्री शिवाजी हायस्कूल व ज्युनियर कॉलेजचे मुख्याध्यापक उत्तमराव खुळे यांचे कार्य देखील दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन नेवासा येथील संत तुकाराम महाराज देवस्थानचे मठाधिपती हभप उद्धव महाराज मंडलिक यांनी केले. येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारण मंडळाच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक उत्तमराव हनुमंता खुळे यांच्या सेवापुर्ती कार्यक्रमाच्या प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ.तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तसेच राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे होते. हभप उद्धव महाराज मंडलिक म्हणाले की, राहुरी तालुक्याशी एक प्रकारे धार्मिक व भावनिक सलोखा असल्याने तालुक्यातील शिक्षण क्षेत्राशी सातत्याने संपर्क येतो. उत्तमराव खुळे यांचे संपूर्ण जीवनपट जर पाहिला तर तो प्रामुख्याने विद्यार्थी आणि सामाजिक क्षेत्राशी संबंधित असल्याचे दिसून येते. अनेक ठिकाणी त्यांनी काम केले परंतु विद्यार्थी हा घटक अग्रस्थानी ठेवला त्यांच्या कार्याची विशेष आहे. शिक्षण क्षेत्रासाठी यापुढे देखील त्यांनी मार्गदर्शक म्हणून कार्य करावे असे देखील मंडलिक महाराज यांनी सांगितले.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण तनपुरे म्हणाले की, उत्तमराव खुळे यांनी पदाच्या माध्यमातून विद्यार्थी व सहकार्यांना नेहमीच आपुलकीची व सन्मानाची वागणूक दिली. विद्यार्थ्यांसाठी काम करत असताना समाजाला देखील मार्गदर्शन करण्याचे काम केले.

मुख्याध्यापक उत्तमराव खुळे यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, आज हा कार्यक्रम सत्कार होत असताना खरंतर डोळ्यात अश्रू तरळत आहे. नोकरीला सुरुवात केल्यापासून आज अखेर ज्या मान्यवरांनी नेहमी मार्गदर्शन केले त्यांच्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. आपण सेवेतून निवृत्त होत असतो तरी यापुढे देखील विद्यार्थ्यांसाठी व समाजातील घटकांसाठी काम करत राहणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी ज्येष्ठ नेते आसाराम ढुस, शिक्षक नेते भाऊसाहेब कचरे, आप्पासाहेब शिंदे, उत्तमराव म्हसे, डॉ.तनपुरे कारखान्याचे संचालक रावसाहेब तनपुरे, ज्ञानेश्वर कोळसे, भारत वारुळे, कृष्णा मुसमाडे, सुनील मोरे, जनार्दन गाडे, वैशाली तारडे, ज्ञानेश्वर पवार यांच्यासह श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व जुनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध शाळांमधील आजी-माजी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदक अप्पासाहेब ढोकणे यांनी केले.

# मुन्सुरी पिंजारी नदाफ संस्थेचा पदग्रहण सोहळा



**राहुरी : हॅलो प्रभात**

केशर लॉन्स, राहुरी येथे मुन्सुरी पिंजारी नदाफ बहुद्देशीय संस्थेच्या वतीने भव्य पदग्रहण समारंभ व दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पिंजारी मन्सुरी नदाफ जमातचे अध्यक्ष आरिफ अली मन्सुरी होते . भिवंडीचे माजी नगरसेवक सिकंदर नदाफ, संस्थेचे महासचिव मुन्नाभाई मन्सुरी (कोपरगाव), गंगापुर नगरसेवक नईमभाई मन्सुरी, डॉ. साजिद सय्यद, नाशिक जिल्हाध्यक्ष ऐनोद्दीन पिंजारी, औरंगाबाद जिल्हाध्यक्ष अन्वर मन्सुरी, अहमदनगर जिल्हाध्यक्ष जावेदभाई मन्सुरी तसेच संगमनेर येथील सामाजिक कार्यकर्ते सलीमभाई पिंजारी आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.या सोहळ्यात दहावी व बारावी परीक्षेत गुणवत्तापूर्वक उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देऊन पदग्रहण समारंभ पार पडले.या कार्यक्रमाला अहमदनगर जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, विविध तालुक्यांतील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुरी तालुका अध्यक्ष मुजाहिदभाई मन्सुरी यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शनही त्यांनीच मान्यवरांचे आभार मानून केले.

# मतदारसंघातील रस्त्यांची अवस्था दयनीय

### विवेक कोल्हे यांची तत्काळ दुरुस्तीची मागणी

**कोपरगांव : हॅलो प्रभात**



कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली असून, प्रवाशांसह शेतकरी व विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत. यात प्रजिमा ०४ रवंदे-धामोरी-रामा ०७ व प्रजिमा ०५ टाकळी-रवंदे या मार्गांवरील मोठमोठे खड्डे नागरिकांच्या जीवावर बेतत आहेत त्याची तातडीने दुरुस्ती करावी असे पत्र कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी प्रशासनाला दिले आहे.या रस्त्याने दररोज हजारो शेतकरी आपल्या शेतमालासह प्रवास करतात. दुध उत्पादकांना वेळेत दूध संकलन केंद्रावर पोहोचण्यासाठी या मार्गाचा उपयोग करावा लागतो. महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांची देखील मोठ्या प्रमाणात ये-जा या रस्त्यावरून होत असते. मात्र, रस्त्यावर सर्वत्र पडलेल्या खोल खड्ड्यांमुळे प्रवाशांना गंभीर अपघातांना सामोरे जावे लागत आहे. अनेक वेळा दुचाकीस्वार घसरून जखमी झालेले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.या पार्श्वभूमीवर, युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, संगमनेर यांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे की, या रस्त्यांचे खड्डे त्वरित बुजवून दुरुस्तीचे काम सुरू करावे. पावसाळ्याच्या दिवसांत खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांचे प्राण धोक्यात येत आहेत. त्यामुळे तात्काळ लक्ष देऊन आवश्यक ती पावले उचलणे ही काळाची गरज आहे.विकास कामांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेचा विश्वास जपण्याचे काम नेहमीच होत असते. त्याचाच एक भाग म्हणून रस्त्यांची दुरुस्ती झाल्यास शेतकरी, विद्यार्थी, दुध उत्पादक व सर्वसामान्य नागरिक यांना दिलासा मिळेल. शेतकऱ्यांचे उत्पादन वेळेत बाजारात पोहोचणे, विद्यार्थ्यांचा सुरक्षित प्रवास होणे, तसेच अपघातांच्या घटना टाळणे या दृष्टीने या रस्त्यांची दुरुस्ती अत्यंत आवश्यक असल्याचे विवेकभैय्या कोल्हे यांनी स्पष्ट केले. त्यांनी पुढे सांगितले की, जनतेचा प्रश्न हीच आमची प्राथमिकता आहे आणि नागरिकांच्या जीवनाशी निगडीत असणाऱ्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही अन्यथा आक्रमक भूमिका घेऊ असा इशारा कोल्हे यांनी दिला आहे.

# पाटस मधून कोरडा शिधा मुंबईकडे रवाना

### मनोज जरांगे-पाटलांच्या हाकेला ग्रामस्थांसह मुस्लिम बांधवांचाही पुढाकार

**दौंड : हॅलो प्रभात**



मराठी आरक्षणासाठी मुंबई येथील आझाद मैदानावर २७ तारखेपासून मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असून त्यांच्यासोबत गेलेल्या लाखो बांधवांसाठी दौंड तालुक्यातील पाटस मधून आझाद मैदानाकडे दोन पिकअप भरुन कोरडा शिधा मुंबईकडे रवाना केला आहे. दरम्यान मनोज जरांगे पाटलांच्या हाकेला पाटस ग्रामस्थांसह मुस्लिम बांधवांनी ही पुढाकार घेऊन साथ दिल्याने त्यांचे मराठा बांधवांकडून आभार व्यक्त केले जात आहेत. मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षण या प्रमुख मागण्यासाठी मुंबई येथे लाखो समाज बांधव आंदोलनात सहभागी झाले आहेत.

दरम्यान लाखो बांधव आंदोलनात सहभागी झाल्याने मुंबईत जिकडे तिकडे मराठा समाज बांधव दिसत आहेत. दरम्यान यामुळे मराठा बांधवांची जेवणाची, पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली असून यामुळे जरांगे पाटलांनी आवाहन करत माझ्या बांधवांचे हाल झाले नाही पाहिजेत त्यांना गावं खेड्यातून मदत झाली पाहिजे असे आवाहन करण्यात आले. आवाहनाला प्रतिसाद देत पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील पाटस येथून उपोषणस्थळी दोन पिकअप गाडी भरुन कोरडा शिधा मुंबईला पोहोच करण्यात आला आहे. यामुळे पाटसकरांचे आभार व्यक्त केले जात आहेत.

आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी पाटस येथील मुस्लिम बांधवांनी ३५ हजार २०० रुपये रोख आणि पाणी बॉटलचे बॉक्स दिले. या आंदोलनाच्या माध्यमातून मराठा - मुस्लिम ऐक्याचं प्रतीक यानिमित्ताने पाटसमध्ये दिसून आले आणि या भावनेचं या कृतीचं सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आलं.

# नगर-मनमाड रस्ता कराचे काय ?



### हजारो प्रवाशांची मागणी; सर्वच पक्षाचे पुढारी गप्प

**राहुरी : दिनेश गायकवाड**

बहुचर्चित आणि लाखो प्रवाशांचा प्राण असलेला नगर मनमाड रस्ता होत नसल्यामुळे नगरशी संपर्क तोडण्याची आता वेळ आली आहे. नगर जिल्ह्यातील खुशमस्करे पुढारी आपापल्या राजकारणात दंग आहेत. रस्ता होत नसल्याने व्यासपीठावरून गोड भाषेत त्यांच्याकडून होणारा उपदेश हा सर्वसामान्य नागरिकांची थट्टा करणारा आहे.प्रचंड खड्डे, तुंबलेली वाहतूक, मध्येच दुचाकी स्वरां कडून मोठ्या गाड्यांना मारले जाणारे कट, वेडे वाकडी वळणे घेत चालणारी वाहने, खड्ड्यांमुळे नादुरुस्त रस्त्यावरच उभी राहणारी वाहने यामुळे सर्वसामान्य प्रवास करणाऱ्यां प्रवाशांवर कपाळावर हात मारून घेण्याची वेळ आली आहे.टोल घ्या पण रस्ता चांगला द्या, किमान प्रवास तरी बऱ्यापैकी करता येईल. श्रीरामपूर जिल्हा नको पण नगर मनमाड रस्ता करा, अशी मागणी लाखो नागरिक करीत आहेत.गेल्या पंधरा वर्षापासून या रस्त्याची अतिशय चाळण झाली आहे. सर्वसामान्यांपासून तर पुढारी आणि मोठमोठाले अधिकारी यांनाही या रस्त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. नगर येथे जाण्यासाठी चोहोबाजूने प्रत्येक तालुक्यातील प्रवाशांना तासभर वेळ लागतो. मात्र सद्यस्थितीत तासनतास या प्रवासात खर्च होत असल्याने नको तो प्रवास अशी म्हणण्याची वेळ आता प्रवास कर्त्यांवर आली आहे. जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांवर हा रस्ता सर्वसामान्य नागरिकांसाठी चांगला करून देण्याची जबाबदारी आणि दायित्व आहे.केंद्र आणि राज्यात भाजपाची एक हाती सत्ता आहे. केंद्रातील नितीन गडकरी यांना या रस्त्याची सारी मजबुरी माहित आहे. माजी खासदार डॉ. सुजय विखे कर्तबगार आणि शब्दाला जागणारे म्हणून तसेच जे बोलतो ते करून दाखवणारे राजकारणी आहेत,असे हजारो नागरिक बोलतात. नगर जिल्ह्यात सर्वत्र चौफेर विकास चालू असल्याचे या नेत्यांकडून ठणकावून सांगण्यात येत असले तरी नगर मनमाड रस्ता मात्र मरणकळा सोसत आहे. राज्यातील अनेक रस्ते दुपदरी तसेच चौपदरी करण्याचे काम वेगाने चालू असले तरी नगर मनमाड रस्त्याची दरिद्री अद्यापही दूर होऊ शकली नाही. नगर येथे काही काम असेल तर मात्र काही तास अगोदरच निघावे लागते. किरकोळ कामासाठी दिवस दिवस रस्त्यांमुळे वाया जात असल्याने सर्वसामान्य प्रवासकर्ते वैतागले आहेत.हा रस्ता व्हावा, यासाठी शिवसेनेचे रावसाहेब खेवरे यांनी अधिकाऱ्यांना घेराव घातला होता. मात्र तो निष्कळ ठरला. माजीखासदार प्रसाद तनपुरे यांनीही नितीन गडकरी यांना चहा पानाचे विशेष आमंत्रण दिले होते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनीही संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेत रस्त्यांच्या कामासंदर्भात कडक सूचना केल्या होत्या. मात्र त्या अद्यापही फळाला आल्या नाहीत. खा. निलेश लंके यांनीही केंद्रीय रस्ते बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांची अनेकदा भेट घेतली. मात्र पुढे काय झाले याबाबत सर्वत्र अंधार आहे. रस्ता केव्हा होईल असे लाखो नागरिक एकमेकांशी सातत्याने बोलतात. श्रीरामपूर जिल्हा नको पण किमान आता हा नगर मनमाड रस्ता तरी करा, अशी नको ती मागणी रागाने करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

# आ.डॉ.अशोकराव माने यांनी केली आंदोलनातील मराठा बांधवांसाठी १ लाखांची मदत

### सकल मराठा समाज शिरोळ तालुक्याकडून आभार

**शिरोळ : हॅलो प्रभात**



हातकणंगले मतदारसंघाचे आ.डॉ.अशोकराव माने यांनी मुंबईत मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या गरजवंत मराठा बांधवांच्या जेवणाच्या व्यवस्थेसाठी रुपये १ लाखांची मदत जाहीर केली. ही मदत सकल मराठा समाज शिरोळ तालुक्याच्या आवाहनानुसार करण्यात आली असून,याबद्दल त्यांच्या कार्याचे समाजाकडून कौतुक होत आहे.

सदर रक्कम आंदोलनस्थळी पोहोचवून मराठा समाजाच्या बांधवांना प्रत्यक्ष मदत करण्यात येणार आहे.या मदतीनंतर सकल मराठा समाज शिरोळ तालुक्याच्या शिष्टमंडळाने आमदार माने यांची भेट घेऊन त्यांचे जाहीर आभार मानले.या सहकार्यामुळे कोल्हापूर येथील मराठा भवनाचा जागेसाठी झालेल्या मराठा समाजातील असंतोष काही अंशी कमी झाला असून, समाजामध्ये आता सकारात्मक चर्चा सुरू आहे.कोल्हापूर येथील १०० कोटी रुपयांची मराठा भवनाची जागा आपल्या संस्थेला मिळून घेतल्याने निर्माण झालेला मराठ्यांचा रोष आमदार माने यांनी आपल्या प्रचंड संवेदनशील आणि जबाबदार भूमिकेतून कमी करण्यात यशस्वी झाले आहेत. दरम्यान मराठा भवनाचा जागेचा बाबतीत भविष्यात कोणताही वाद उद्भवला, तरी शिरोळ तालुक्यातील मराठा समाज डॉ. अशोकराव माने यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, अशी चर्चा कोल्हापूर,हातकणंगले आणि शिरोळ तालुक्यात रंगली आहे.

मराठा समाजाच्या मागण्यांप्रती आमदार माने हे सातत्याने सकारात्मक आणि सहानुभूतीपूर्वक भूमिका घेत असून,त्यांनी वेळोवेळी समाजासाठी घेतलेल्या निर्णयांचे स्वागत होत आहे.

मात्र यावेळी कोल्हापूर येथील मराठा भवनाचा जागेसाठी आ. माने यांनी आपली भूमिका स्पष्ट केली नाही त्यामुळे त्यांच्या भूमिकेकडे कोल्हापूर शहरातील मराठा नेत्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

# श्रींच्या मुर्ती विसर्जनासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

येथील महापालिकेने घरगुती श्रींच्या मुर्ती विसर्जनासाठी शहापुर खणीसह ५२ ठिकाणी कृत्रिम कुंडांची सोय केली आहे.

या कुंडांच्या ठिकाणी २ सप्टेंबर रोजी २ शिफ्टमध्ये सुमारे ६०० कर्मचारी पुर्णवेळ नियुक्त करण्यात आले आहेत. १६ आयशर टेंपो, ५ ट्रॅक्टर, २ यांत्रिक बोटी, २ रुग्ण वाहिका, १ अग्निशमन वाहन अशी यंत्रणाही सज्ज ठेवली आहे.

# उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी कामेरीतून एक ट्रॅव्हल्स जाणार

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या मुंबई आझाद मैदानावरील उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी कामेरी गावातील तरुण बांधव मुंबईला जाणार आहेत. २ सप्टेंबर रोजी रात्री नऊ वा.कामेरी बाजारपेठ येथून निघावयाचे असून एक दिवस मुक्काम करून पाठिंबा देऊन परत येण्याचे आहे. त्यासाठी कामेरी गावातील दानशूर व्यक्तींनी मोफत ट्रॅव्हल्स चे नियोजन केले आहे. ज्या ज्या बांधवांना मुंबईला येण्याची इच्छा आहे त्यांनी खालील दिलेल्या व्यक्तींशी संपर्क साधून आपल्या नावाची नोंद करावयाची आहे. योगेश पाटील,सुमित जाधव,प्रवीण पाटील,विश्वजीत पाटील बांधवांनी मराठा आरक्षण मिळण्यासाठी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद द्यावा असे आवाहन मराठा क्रांती मोर्चा तर्फे करण्यात आले आहे.

# श्री गणेशाच्या कामगारांची देणी अदा,कोल्हेंकडून वचनपूर्ती

### विवेक कोल्हेंनी गणेश कर्मचाऱ्यांना दिलेला शब्द केला पूर्ण

**कोपरगांव : हॅलो प्रभात**



श्री गणेश परिसरातील शेतकरी आणि कामगार हितासाठी सदैव तत्पर राहणाऱ्या श्री गणेश सहकारी साखर कारखान्याने कामगार बांधवांचा दीर्घकाळ प्रलंबित देणी असलेला प्रश्न मार्गी लावत मोठा दिलासा मिळाला आहे. कारखान्याच्या स्थापनेपासून कामगारांनी केलेल्या योगदानाची दखल घेत १९८८ पासून थकीत असलेली देणी व २०१७ पासून निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी, तसेच कार्यरत कर्मचाऱ्याची देणी अदा करण्यात आली असून कामगारांना यामुळे दिलासा मिळाला आहे.यासह २०१७ पासून निवृत्त झालेल्या कामगारांची मिळून तब्बल ६ कोटी ६५ लाख रुपयांची थकबाकी रक्कम मंजूर करून देण्यात आली आहे. प्रोव्हिडंट फंड आणि ग्रॅज्युटी,फरक,थकीत पगार या थकबाकीचा निपटारा झाल्यामुळे पाचशे कार्यरत कर्मचारी व दोनशे सेवानिवृत्त कर्मचारी यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे कामगारांच्या आयुष्यात नवी ऊर्जा निर्माण झाली असून हा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल त्यांनी गणेश कारखान्याचे मार्गदर्शक व जिल्हा बँकेचे संचालक, युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.या प्रसंगी बोलताना विवेकभैय्या कोल्हे म्हणाले की, कामगार बांधवांचे प्रश्न सुटले पाहिजेत, यासाठी कारखाना सुरळीत चालणे आवश्यक आहे. ही भूमिका ठामपणे मांडत आम्ही अनेक निर्णय घेतले आणि त्यातून बहुतांशी प्रश्न मार्गी लागले आहेत. उर्वरित प्रश्न सोडवण्यासाठीही आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.

ते पुढे म्हणाले की, सहकार चळवळ टिकवण्यासाठी शेतकरी सभासद, कारखाना कर्मचारी आणि संचालक मंडळ या तिहेरी ऐक्याची आवश्यकता असते. या ऐक्यामुळेच गणेश सहकारी साखर कारखान्याची गाडी सुरळीत धावते आहे. कामगारांची थकीत देणी देण्यासाठी आम्ही कटिबद्ध होतो, त्यावेळी जो विश्वास दिला होता त्याची फलश्रुती आज प्रत्यक्षात दिसून आली आहे.कामगारांच्या थकीत प्रश्नांची उकल आणि निवृत्त कर्मचाऱ्यांच्या देणगीची वेळेत सोडवणूक यामुळे गणेश कारखाना हा केवळ उत्पादनकेंद्र न राहता कामगारांचे खरे आश्रयस्थान असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे

# 'आयजीएम'च्या वतीने आरोग्य तपासणी शिबीर

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने श्री गणेशा आरोग्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत आयजीएम रुग्णालयाच्यावतीने यशवंत कॉलनी गणेश मंडळात आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी ६० नागरीकांची तपासणी करण्यात आली.गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री फडणवीस, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची अभिनव कल्पना आहे. श्री गणेशा आरोग्याचा या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976